पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक ३७

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २७/११/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**दाखल विषय**

**विषय क्र. १२१८**

मा.सुनिल कांबळे, मा.संदिप लडकत व मा.राजेंद्र काची यांचे दि. २७/११/२००७ चे पत्र.

स्थायी समितीत ठराव क्र. १०९५, १०९६, १०९७, १०९८, १०९९ दि. ७/११/२००७ बाबत फेरटेंडर्स काढणेत आलेली आहेत. याच पॅकेजमधील अन्य सर्व ११ विषयांचेही तातडीने फेरटेंडर्स काढणेत यावेत.

**विषय क्र. १२१९**

मा.संदिप लडकत व मा.सुनिल बनकर यांचे दि. २७/११/२००७ चे पत्र.

दारु (मद्य) हा सामाजिक प्रश्न बनला आहे. महाराष्ट्रात संपुर्ण दारुबंदी व्हावी याकरिता युवक क्रांती दल प्रयत्नशील आहे. त्याचा पहिला टप्पा म्हणून राज्यांत ठिकठिकाणी महाराष्ट्र दारुबंदी परिषदा घेण्यात येणार आहेत. याच चळवळीत राज्यातील विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्ती व स्वयंसेवी संस्था सहभागी आहेत.

दारुमुळे महिला व बाल कल्याण, समाजकल्याण आणि आरोग्य विभागाची उद्दिष्टे साध्य होण्यास अडथळे निर्माण होत आहेत. म्हणूनच मनपाच्या तिन्ही विभागांचा व युवक क्रांती दलच्या संयुक्तपणे पुण्यातील नियोजित महाराष्ट्र दारुबंदी परिषद हा कार्यक्रम व्हावा यासाठी पुणे मनपाने सहप्रायोजक म्हणुन भाग घेण्यास व या कार्यक्रमासाठी दि. ७ जानेवारी २००८ रोजी गणेश कला क्रिडा केंद्र मोफत उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. १२२०**

मा.विजय मारटकर व मा.वसंत मोरे यांचे दि. २७/११/२००७ चे पत्र.

गुंठेवारी नियमांतर्गत विविध क्षेत्रिय कार्यालयामध्ये काम करीत असलेल्या १० कनिष्ठ अभियंता तसेच एक सहा.अभियंता यांची मुदत दि. १३/११/२००७ रोजी संपुष्टात आली असल्याने गुंठेवारी प्रकरणे निकाली काढणे अडचणीचे झाले आहे. त्यामुळे नागरिकांची होणारी गैरसोय टाळणेसाठी तसेच गुंठेवारी प्रकरणे निकाली काढणेसाठी यापुर्वी काम केलेल्या १० कनिष्ठ अभियंता व एक सहा.अभियंता यांची अनुक्रमे र.रुपये ४,५००/- व र.रुपये १०,०००/- मासिक मोबदला देवून पुढील ६ महिन्यांसाठी नेमणूक करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. १२२१**

World Leadership Awards 2007 करिता पात्रता फेरीमध्ये दाखल झालेल्या (1) "Automatic Scrutiny of Building Proposal" (Architecture & Civil Engineering Category), व (2) "Unwire Pune" (Science & Technology Category) या दोन संगणक प्रणालीच्या सादरीकरणाकरीता मा.सौ.राजलक्ष्मी भोसले, महापौर व पुणे मनपाचे अधिकारी १) मा.प्रशांत वाघमारे - नगर अभियंता २) मा.श्री.अंबरिश गालिंदे - सह आयुक्त ३) मा.श्री.किशोर मोरे - उप आयुक्त ४) मा.विनोद क्षिरसागर - कनिष्ठ अभियंता यांना लंडन येथे जाणे व परत येण्याकरिता प्रवास खर्च, निवास व तदनुषंगिक खर्च करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/७६९ दि. २३/११/२००७ चे पत्र.

**शरद समेळ,**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**